सन २०१५-१६ साठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागास नेमून दिलेल्या KRA ची पूर्तता करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : कौविउ- २०१५/प्र.क्र.१३४/अभियान-१

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३० नोव्हेंबर,२०१५.

संदर्भ : १) या विभागाची समक्रमांकाची दिनांक २५.८.२०१५ व दिनांक ७.९.२०१५ रोजीची पत्रे.

२) मा. मुख्य सचिव यांचे अ.शा.पत्र क्र. CSO-२०१५/e-१२९३११४/D-१, दिनांक ९.१०.२०१५.

३) शासन परिपत्रक कौ.वि.व उ.वि.क्र.लोलेस-२०१५/प्र.क्र.१९२/रोस्वरो-२, दिनांक २७.१०.२०१५

प्रस्तावना :

उपरोक्त संदर्भ क्र.१ दिनांक २५.८.२०१५ अन्वये सन २०१५-१६ करिता कौशल्य विकास व उद्योजकता विभागासाठी ११ KRA निश्चित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.१ दिनांक ७.९.२०१५ च्या पत्रान्वये KRA तील मुद्दयांवर साध्य केलेल्या भौतिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विभागाच्या अधिनस्त कार्यालये/कार्यासने यांना Key Performance Indicators (KPI)/Physical Target तयार करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल प्रत्येक महिन्यास शासनाकडे पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे, जेणेकरुन विभागाने KRA बाबत केलेल्या प्रगती अहवालाची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून तयार करण्यात आलेल्या kra.maharashtra.gov.in या वेब पोर्टलवर भरता येईल. विधानमंडळाशी संबंधित कामकाजाचा विहीत कालावधीत निपटारा होत नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे मा. मुख्य सचिव यांनी संदर्भ क्र. २ दिनांक ९.१०.२०१५ च्या पत्रान्वये विधानमंडळाच्या कामकाजाच्या अनुषंगाने अतिरिक्त KRA चा समावेश करण्याबाबत सूचित केल्यानुसार विभागाने संदर्भ क्र. ३ दिनांक २७.१०.२०१५ अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुषंगाने कौशल्य विकास व उद्योजकता विभागासाठी निश्चित करण्यात आलेले KRA व त्याबाबत अधिका-यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत जबाबदारी निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :

सन २०१५-१६ करिता विभागास नेमून दिलेले १२ KRA (उद्दिष्टये) अधिकाऱ्यांना विहीत वेळेत साध्य होतील या दृष्टीने खालील विवरणपत्रात नमूद केलेला कालावधी निश्चित करण्यात आला असून, सदर उद्दिष्टपूर्तीसाठी केलेली कामगिरी विचारात घेऊन अधिकाऱ्यांचे वार्षिक कार्यमुल्यांकन ठरविण्यात येणार आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अ.क्र.	अपेक्षित कार्यवाही/उद्दिष्टये	कालमर्यादा	कार्यवाही करणारे अधिकारी
१)	विविध विभागांच्या समन्वय व सहभागाने या वर्ष अखेरीस सुमारे २ लाख मनुष्यबळाला रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे. वरील उद्दिष्टे Non Negotiable (तडजोडीस अपात्र) न समजता प्रामाणिक प्रयत्नांच्या आधारे मूल्यमापन होतील.	दि.३१.३.२०१६	आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन- रोस्वरो -१ , कौ.वि.वउ.वि.,
२)	उद्योग, नोकरी पुरविणाऱ्या कंपन्या यांचेशी समन्वय साधुन उद्योगांच्या आवश्यकतेनुसार कुशलता निर्माण करण्याची व्यवस्था विद्यापीठ व तंत्र शिक्षण विभागाशी चर्चा करुन अमंलात आणणे.	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी (व्यशि-५) कौ. वि.व उ. वि. संचालक व सह संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
३)	उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या समन्वय व सहभागाने १ लाख उमेदवारांना प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून रोजगारक्षम बनविणे.	दि.३१.३.२०१६	अवर सचिव (व्यशि-३) कौ.वि.व उ.वि. संचालक व सह संचालक व्यवसाय शिक्षण / व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय
४)	कौशल्य विकास याकरीता केंद्रीय पोर्टल तयार करुन सर्व खाजगी उद्योग/ रिक्त पदे/रोजगार जाहीरात/ सर्व कौशल्य विकास संस्था/आयटीआयमध्ये प्रशिक्षित युवकांची यादी ठेवणे व देशभरातील मागणी (Job Opening) व पूर्तता महाराष्ट्रातील युवकांना जोडण्यात येईल.	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी, अभियान-१ कौ.वि.वउ.वि. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, मुंबई.
५)	राज्यातील मनुष्यबळाच्या कल चाचणी आधारे मूल्यमापन व समुपदेशनाद्वारे उपयुक्त क्षेत्रात रोजगार/ स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी जिल्हयातील कार्यालयांचे तालुका किंवा गाव समुहापर्यंत विकेंद्रीकरण करुन त्यांचेमार्फत लाभार्थींची नोंदणी, मूल्यमापन व मार्गदर्शनाच्या आधारे तसेच आवश्यकतेप्रमाणे प्रशिक्षण आयोजित करुन ठरलेल्या उद्दिष्टांप्रमाणे रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करणे.	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी, अभियान-१ कौ.वि.वउ.वि. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, मुंबई.
६)	कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याबाबत अशा विद्यापीठाचे स्वरुप, कार्यकक्षा व या प्रकारच्या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असल्यास त्याबाबतचे अनुभव इत्यादिंचा सखोल अभ्यास करुन कार्यवाही करण्यात येईल.	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी (व्यशि-५) कौ. वि.व उ. वि.

७)	विविध मागणी असलेल्या क्षेत्रांसाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणाऱ्या सुमारे ५०० प्रशिक्षण संस्थांमध्ये वाढ करून वर्ष अखेर पर्यंत सुमारे ३००० संस्था सूचीबद्ध करण्यात येतील.	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी , अभियान-१ कौ.वि.वउ.वि. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, मुंबई.
८)	आयटीआय संस्थांच्या कामगिरीचे निकष निर्धारणानुसार त्यांच्या मूल्यमापनाची पद्धत ठरविणे. उद्योग समुहाच्या सहभागाने तसेच संस्था व्यवस्थापन समित्या (IMC) यांच्या सक्षमीकरणाद्वारे आयटीआयमार्फत उद्योग क्षेत्रातील विविध मागणीनुरुप प्रत्येक आयटीआय साठी रोजगारक्षम कुशल मनुष्यबळ पुरवठ्याचे निकषांआधारे त्यांच्या मूल्यमापनाची पद्धत ठरविण्यात येईल.	दि.३१.३.२०१६	अवर सचिव (व्यशि-३) कौ. वि.व उ. वि.
९)	विविध विभाग व त्यांच्या अधिपत्त्याखालील महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण जुलै, २०१४ पासून या विभागाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या स्वयंरोजगार योजनांसाठी कार्यान्वित "महास्वयंरोजगार" पोर्टलमार्फत विविध विभागांच्या समन्वय व सहकार्याने करण्यात येईल.	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन - रोस्वरो -१ , कौ.वि.वउ.वि., व्यवस्थापकीय संचालक अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई.
१०)	या विभागाकडील राबविण्यात येणाऱ्या सद्यस्थितीतील योजना दि. ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत सुधारीत करून राबविण्याचे प्रयत्न करण्यात येतील	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी/अवर सचिव, कार्यासन - रोस्वरो -१ , कौ.वि.वउ.वि., आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, मुंबई.
११)	क्षेत्रीय कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही येत्या ६ महिन्यात करण्यात येईल.	दि.३१.३.२०१६	कक्ष अधिकारी /कार्यासन प्रशा-२ कौ.वि.वउ.वि., आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, मुंबई.
१२)	Disposal of matters pertaining to Legislature which will include disposal of paras pertaining to Public Accounts Committee and other Committees, timely replay to pending Starred/Unstarred Questions, Calling Attention	विधीमंडळाच्या संबंधीत समित्या /महाराष्ट्र विधानमंडळाने	प्रधान सचिव,सह/उप सचिव कक्ष अधिकारी/अवर सचिव (सर्व कार्यासने) कौ.वि. व उ. वि.

	Motions, Point of propriety, Cut Motions etc.	ठरवून दिलेली कालमर्यादा.	आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, मुंबई. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, मुंबई. व्यवस्थापकीय संचालक अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई. संचालक व सह संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

२. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी उपरोक्त नमूद विभागाच्या KRA बाबत Key Performance Indicators (KPI)/Physical Target तयार करुन योग्य ती कार्यवाही करावी व त्याबाबतचा प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा सांकेतांक २०१६०१०८१६३५५९९००३ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Usha Prakash Mahajan

Digitally signed by Usha Prakash Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Usha Prakash Mahajan
Date: 2016.01.08 16:37:18 +05'30'

(उ . प्र. महाजन)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, मुंबई,
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, मुंबई,
३) व्यवस्थापकीय संचालक अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई,
४) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
५) सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
६) सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग.
७) निवड नस्ती.